# कमला महाविद्यालयात रंगरावदादा यांची पुण्यतिथी

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : स्वातंत्र्यसेनानी, ताराराणी विद्यापीठाचे माजी उपाध्यक्ष क्रांतिवीर रंगरावदादा पाटील यांच्या १६ वी पुण्यतिथीनिमित्त कमला महाविद्यालयात अभिवादन करण्यात आले. क्रांतिवीर रंगरावदादा पाटील यांचे स्वातंत्र्य चळवळीतील सहकारी ॲड. मदनराव देशमुख-खोत उपस्थित होते. त्यांच्या हस्ते रंगरावदादा पाटील यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी कमला कॉलेजच्या स्थापनेपासून महाविद्यालय अनुदान तत्त्वावर आणण्यासाठी दादांचे असलेले योगदान विशद केले. रंगरावदादा पाटील यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले. प्रा. मधुकर पाटील उपस्थित होते. प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर, प्रा. डॉ.व्ही.व्ही. मैंदर्गी, प्रा.डॉ.एन. एस.धुमाळ, प्रा.आर.डी.पंडित, प्रा. व्ही.पी.साठे, प्रा.डॉ. अनिल घस्ते, प्रा.डॉ. सुजय पाटील, एस.बी.शिंदे, प्रताप रंगापुरे उपस्थित होते. ग्रंथपाल ऊर्मिला कदम आर्दींनी आयोजन केले.

Scanned by CamScanner